नि.फौ.ख.क्र. १२१/२०१६

सरकार वि. दादासाहेब वगैरे व इतर

निशाणी क्र. ६५

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र. २ यांची साक्ष**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**माझे नाव** :– रोहित सर्जेराव देवकुळे
**वय** :– २९ वर्षे, **धंदा** :– नोकरी
**राहणार** :– गोमेवाडी, ता. आटपाडी, जि. सांगली.

**सरतपासणी अभियोगपक्षातर्फे – श्रीमती ए.पी.केसकर, विद्यमान सहा. सरकारी वकील यांचेमार्फत**

**०१.** दि. १७/०९/२०१६ रोजी मला पंचनाम्यासाठी बोलाविले होते. मी पंचनाम्यासाठी गोमेवाडी गावातील गणपती मंदीरासमोर गेलो होतो. माझ्यासोबत दुसरे पंच अजय कोंडीबा सोहनी हे होते. ज्याठिकाणी भांडण झाले होते त्याठिकाणचा पंचनामा करायचा होता आणि त्याठिकाणी चाकू पडला होता त्याचा पंचनामा करायचा होता. आम्ही, पोलीस आणि आशिष सोहनी व विक्रम देवकुळे असे त्याठिकाणी गेलो. तेथे एक चाकू पडला होता. पोलीसांनी तो चाकू आम्हाला दाखविला व आम्ही तो जप्त केला. त्यानंतर पंचनामा केला. नकाशा तयार केला. नकाशा आणि पंचनाम्यावर आम्ही सह्या केल्या. जप्त केलेल्या चाकूवर आमच्या सह्यांच्या चिठ्ठया लावण्यात आल्या. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझ्या सह्या आहेत. त्यास **निशाणी ६६** देण्यात येते. आता मला जप्त चाकू 'आर्टिकल अ' दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यावर माझ्या सहीची चिठ्ठी आहे.

**उलटतपास आरोपीतर्फे – श्री.पी.डी. जेडगे विद्यमान वकील यांच्यामार्फत सुरु**

**आरोपीच्या वकीलांच्या निशाणी ६७ वरील अर्जान्वये साक्षीदाराचा उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.**

श्रवणोत्तर स्विकृती,

समक्ष,

RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Digitally signed by RAHUL BHALCHANDRA KULKARNI
Date: 2025.02.24 17:51:04 +0530

दि. २४/०२/२०२५
आटपाडी.

( आर. बी. कुलकर्णी )
सह न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग,
आटपाडी